गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886





https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282


### दीपावलीत अन्नसुरक्षेसाठी प्रशासनाची मोहीम

## भेसळ रोखण्याचा संकल्प की कागदोपत्री औपचारिकता?

**जालना । प्रतिनिधी -** सणासुदीच्या दिवसांत नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्याच्या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने 'सण महाराष्ट्राचा - संकल्प अन्न सुरक्षेचा' या राज्यव्यापी मोहिम अंतर्गत जालना जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मिठाई, खवा, तूप, सुकामेवा, खाद्यतेल आदी अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील विविध उत्पादक, वितरक, घाऊक विक्रेते आणि मिठाई उत्पादक आस्थापनांवर तपासण्या घेण्यात आल्या असून आतापर्यंत एकूण ४१ अन्न नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. यात दूध, खवा, पनीर, तूप, सुकामेवा, मिठाई तसेच खाद्यतेल यांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे कमी दर्जाचे असल्याच्या संशयावरून १३ हजार ८९९ किलो खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला असून त्याची बाजार किंमत २१ लाख २७ हजार ७४२ रुपये इतकी आहे. या नमुन्यांचा अहवाल प्राप्त होताच अन्नसुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे सहाय्यक आयुक्त निखील कुलकर्णी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले. नागरिकांनी दुध व खव्यापासून बनवलेली मिठाई २४ तासांच्या आतच सेवन करावी आणि फक्त परवाना धारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावी, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

प्रशासनाने तपासणीसंदर्भात आकडेवारी जाहीर केली असली तरी कोणत्या आस्थापनांवर तपासणी झाली, कोणत्या ठिकाणांहून नमुने घेतले गेले किंवा कोणाकडून जप्ती करण्यात आली याबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे ही कारवाई केवळ आकडेवारीपुरती मर्यादित राहिली की प्रत्यक्ष भेसळ रोखण्याचा ठोस प्रयत्न झाला, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीच्या काळात अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाया सुरू झाल्या आहेत. मात्र गेल्या काही वर्षांत भेसळयुक्त मिठाई, नकली तूप, रंगीत खवा व निकृष्ट दर्जाचे तेल बाजारात मोठ्या प्रमाणात विक्रीस येत असतानाही त्यावर ठोस कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे प्रशासनाची ही मोहीम केवळ कागदोपत्री औपचारिकता ठरते की खऱ्या अर्थाने ग्राहक संरक्षणाचे काम करते, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

अन्नसुरक्षेचा प्रश्न केवळ सरकारी कारवाईपुरता मर्यादित नसून तो ग्राहकांच्या जागरूकतेशीही निगडीत आहे. नागरिकांनी मिठाई खरेदी करताना दुकानाचा परवाना क्रमांक तपासावा, अनावश्यक चमक, रंग किंवा सुगंध असलेली मिठाई घेणे टाळावे आणि शंका आल्यास ऋऊ कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जालना जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहीम सुरू करून योग्य दिशेने पाऊल टाकले असले तरी पारदर्शकतेचा अभाव जाणवतो.

कोणत्या दुकानांतून नमुने घेतले गेले, कोणती आस्थापने नियमभंगात सापडली,, आणि किती कारवाई प्रत्यक्षात झाली याचा स्पष्ट अहवाल जाहीर न केल्यास ही मोहीम केवळ आकडेवारीचा खेळ ठरेल.

ग्राहकांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या अन्नसुरक्षेच्या बाबतीत 'संकल्प अन्न सुरक्षेचा' हा नारा प्रत्यक्ष अंमलात आणण्याची खरी वेळ आता आली आहे.

यासंदर्भात अन्नचे निखील कुलकर्णी यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी युवा आदर्शकडून त्यांचा मोबाईल क्रमांकावर फोन करण्यात आला मात्र, त्यांनी प्रतिसाद दिला नसल्याने याबाबत अधिक माहिती मिळू शकली नाही.

## नाट्यगृह आणि आंबेडकर सभागृह दुरावस्थेत

### सांस्कृतिक प्रेमींचा संताप, दुरुस्तीची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर हे पूर्वापार सांस्कृतिक आणि कलाप्रेमी परंपरेसाठी ओळखले जाते. या शहराने अनेक नामवंत कलाकार, साहित्यिक आणि रंगकर्मी घडवले आहेत. मराठवाड्यातील पहिले नाट्यगृह उभारण्याचा मान जालना शहराला मिळाला असून, तत्कालीन नगराध्यक्ष स्व. माणिकचंद बोथरा यांनी या शहराच्या सांस्कृतिक ओळखीला आकार दिला होता.

परंतु, आज हेच नाट्यगृह आणि शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह अत्यंत दयनीय अवस्थेत पोहोचले असून, नागरिक आणि कलाप्रेमींच्या नाराजीचा सूर तीव्र झाला आहे.

गेल्या १५ ते २० वर्षांपासून या नाट्यगृहावर लाखो रुपयांचा खर्च दुरुस्तीच्या नावाखाली केला गेला असल्याची माहिती आहे. मात्र, प्रत्यक्षात नाट्यगृहाची अवस्था पूर्वीपेक्षा अधिक वाईट झाल्याचे स्थानिक कलावंत सांगतात. छत गळते, आसन व्यवस्था निकृष्ट, आणि ध्वनी-प्रकाश व्यवस्था अपुरी आहे. यामुळे नाट्यप्रेमी, रंगकर्मी आणि आयोजक यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.

फक्त नाट्यगृहच नव्हे तर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाचीही अवस्था अत्यंत **पान २ वर**

## पेंशन अदालतीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयातील आस्थापना उपायुक्त यांनी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निकाली काढण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानूसार पेंशन अदालत दि.२९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जालना जिल्हा परिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य यांच्या दालनात आयोजित करण्यात आली आहे.

आपली प्रकरणे पेंशन अदालतीमध्ये ठेवण्यासाठी सेवानिवृत्तांनी प्रलंबित प्रश्न, अर्ज, पोस्टाने, ई-मेल किंवा हस्तपोच जिल्हा परिषदेतील सामान्य प्रशासन विभागात दि.२४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सादर करावेत.

तरी पेंशन अदालतीसाठी सेवानिवृत्तांनी, कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांनी प्रकरणाच्या माहितीसह उपस्थित रहावे, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

युवा आदर्श

### सृष्टी दिन ...

सुंदर या जगी काही
दु:खीकष्टी दृष्टीहीन
उघड्या डोळा पाही
आपणही हीन दीन
पुण्यकर्म सहज घडे
करू चला नेत्रदान
मरणोत्तर पाहू शके
नवी दृष्टी सृष्टी छान
त्रासमुळी नसे काही
हवी इच्छा मनातून
भावनेला आवरावे
सत्कर्म घडेलं हातून
कलेवरां मोह फुका
गेल्यावरती जगातून
शुष्ककाष्ठ जणूंअसे
अंती जाणार जळून
दृष्टीरूपे राहे जीवंत
जग घ्यायचे पाहून
येती पुढे बाकीचेही
आपले पाऊल पाहून

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## चोरीस गेलेले आणि हरवलेले ६० मोबाईल फोन तक्रारदारांना केले परत

### कदीम जालना पोलिसांची कारवाई



**जालना । प्रतिनिधी** - चोरीस गेलेले आणि हरवलेल्या तब्बल ३,५०,००० रुपये किमतीचे एकूण ६० वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईलचा कदीम जालना पोलिसांनी शोध लावला आहे. मागील दोन वर्षांत कदीम जालना पोलीस ठाण्यात मोबाईल चोरी आणि मोबाईल हरवण्याच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. या तक्रारींवर कार्यवाही करताना पोलिसांनी उ.ए.ख.ठ प्रणालीच्या मदतीने एकूण ६० मोबाईल फोनचा शोध लावला आहे. आज जालना जिल्हा पोलीस अधीक्षक आणि अपर पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते हे सर्व मोबाईल फोन तक्रारदारांना सुपूर्द करण्यात आले. दरम्यान, आपले हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदारांनी पोलिसांचे आभार मानले आहेत. यावेळी जालना पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांच्यासह पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्री उपस्थिती होते.

**C.E.I.R प्रणालीच्या मदतीने पोलिसांनी लावला हरवलेल्या आणि चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध**



## संपादकीय

# खाद्यपुर्तीसाठी अन्नाचा एक-एक कण वाचविण्याची गरज

विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील उपासमारी संपुष्टात येईल.खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ आक्टोंबर १९४५ ला खाद्य व कृषि संघटन ( एफएओ ) ची स्थापणा केली.कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश(एफएओ) ने १६ आक्टोंबर १९७९ पासून विश्व खाद्य दिवससाजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस साजरा केल्या जातो.या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची(उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरूक करने.उपासमारी, कुपोषण व गरीबीच्या विरूद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करने.उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरू आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे. विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आनणे.परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की,या कार्यक्रमाच्या इतके वर्षांनंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवण सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.अन्न हे पुर्ण ब्रम्ह म्हटल्या जाते.कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव,जीवजंतू,वन्यप्राणी,जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असतेच. त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे. अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते. त्याचबरोर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे.कारण पाणी रहाले तरच अन्नाचे उत्पादन होवु शकते.१६ आक्टोंबर संपूर्ण जग विश्व खाद्य दिवसम्हणुन साजरा करतात. कारण खाद्यांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मीळवीण्यासाठी का धावपळ करतो?, मोल-मजुर, कामगारांना काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो वितभर पोटाची खळगी भरणे कारण काहीना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे यालाही नाकारता येत नाही. करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात उपासमारीची समस्या ओढावली होती.कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता.त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली होती.या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले.अशाप्रकारचे उग्ररूप करोणा काळात दीसुन आले.जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातुन घाम गाळतो व शेती पिकवितो. तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या पोटाची खळगी भरते. म्हणुनच शेतकऱ्यांना अन्नदाता म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येवु शकते. परंतु मानवजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे सर्वप्रथम १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी शतशत प्रणाम करतो. कारण उन,पाऊस,थंडी,ओला

दुष्काळ,कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो.भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच कृषिप्रधान देशपरंतु गेल्या ७८ वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी अत्यंत दुःखी असल्याचे दिसून येते. कारण आजही शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही. सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही.त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते.आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे. परंतु आर्थिकदृष्ट्या कंगाल व शुन्य आहे.कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल,व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करतांना दिसतात.आज व्यापाऱ्याजवळ, राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला,सोने-नाने,चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी भोपळा आल्याचे दिसून येते.कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या ७८ वर्षांपासून आपण पहात आहोत. त्यामुळे आज शेतकरी वर्ग मगासलेला आहे.भारत स्वतंत्र झाल्यानंतरही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता पडू दिली नाही.परंतु चीनमध्ये १९७० मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते.म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप,कीडे-माकोडे व अन्य प्राणी खायला सुरुवात केली. चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्रांण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली. अशा कठीण परिस्थितीतुन जावुनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे.याचे संपूर्ण चीत्र आपल्याला वुहान प्रांतातुन दीसुन आले. परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पुर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता व एकनिष्ठता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊनच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात. आजही भारतात मेळघाट सारख्या व अतिदुर्गम भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का?याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे. आज भारतात उलटी गंगा वाहतांना दीसते देशातील ६० टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे.परंतु आजही भारतीय शेतकरी गरीब आहे.याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांचे फक्त रक्त पिण्याचे काम केल्याचे दिसून येते. त्यामुळेच आज भारतात अनेक भागातील अन्नदाता शेतकरी आत्महत्यां करतांना दिसतो.कारण त्यांची संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते.आतातर वाढते प्रदुषण व ग्लोबल वॉर्मिंगमुळे मोठ्या प्रमाणात हवामानात बदल झाल्याने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत आनुण ठेवले आहे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकरी सरकारला विचारते की मुठभर नगरसेवक, आजी-माजी आमदार-खासदार व मंत्री मेहनत न करता पाच वर्षांत करोडपती व अरबोपती कसेकाय होतात? राजकीय पुढारी शेतकऱ्यांपेक्षा एवढा मोठा आहे का?की त्याला गलेलठ्ठ पगार, पेन्शन,इतर भत्ते सरकार देते व शेतकऱ्यांना भोपळा देते.हे लोकशाहीच्या देशात चालय्य तरी काय?सर्व राजकीय पुढारी सांगतात की आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत. समान अधिकार,समान न्याय असे खोकले आश्वासन देतात. परंतु आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारीच शेतकऱ्यांचा घात करतांना दिसत आहे.त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या प्रती जागरूकता दाखवुन विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली पाहिजे.आंतरराष्ट्री माहिती नुसार जगात उपाश्यापोटी झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येत आहे.संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटना नुसार २००२ च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत १४० टक्याने भारीभरकम वाढ झाली आहे.यामुळे डिसेंबर २००७ पासुन ४० देशांना खाद्यांन्न संकटाचा सामना करावा लागत होता.सध्या गेल्या अडीच वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध भयावह स्थितीमध्ये आहे आणि आणि आता अचानक इजरायल- हमास-हिज्बुल्ला-इराण यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे.यामुळे युध्दाचा भडका महाभयानक स्थितीत आहे.याचा परिणाम अन्नसाठ्यावर होवून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे व पुढे आणखी भयावह परिस्थिती होऊ शकते. भारतीय खाद्य निगमने स्वतः कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील ५० करोड रुपयांचा अनाज म्हणजे १०.४० लाख मीट्रिक टन पर्यंत अनाज सडतो किंवा खराब होतो.हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर, दुःखद व चिंताजनक बाब आहे.कारण खराब होणारे अन्न-धान्य प्रत्येकवर्षी सव्वा करोड लोकांची भुक मीटवु शकते. परंतु भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की शेतकऱ्यांनी मेहनतीने तयार केलेला लाखो टन अनाज सडतो आणि यामुळेच भुकमरीची समस्या उद्भवत आहे याला नाकारता येत नाही. यामुळेच भारतात करोडो लोक उपाश्यापोटी झोपतांना दीसतात.भारताची हेही समस्या आहे की सहा वर्षांखालील ४७ टक्के मुले कुपोषणाची शीकार होत आहे.एफएओच्या माहिती नुसार भारतात २००८ मध्ये २० करोड १० लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते.ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या २०२३ च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्व भुकमरी सुचकांकमध्ये १२५ देशांच्या तुलनेत १११ वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे.या उलट भारताच्या शेजारील देशांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती भारतापेक्षा चांगली आहे यात पाकिस्तान- १०२, बांगलादेश-८१, नेपाळ-६९, श्रीलंका -६० व्या स्थानावर आहे.गेल्या काही महिन्यांपासून देशातील २० कोटी लोकांना मोफत अन्न-धान्याची प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना असतांना सुध्दा भुकबळीची संख्या वाढत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.भारतात सर्वेमध्ये हेही लक्षात आले की लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे. आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कण वाचवीण्याची गरज आहे.आज अन्नाचा प्रत्येक दाना महत्वाचा आहे. तेव्हाच म्हणतात दाने दाने पे लिखा है, खाने वाले का नाम या म्हणीची पुर्ततः होवु शकते. आज १४० कोटी जनतेचे दायीत्व बनते की अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी १४० कोटी जनतेला विनंती करतो की अन्नाचा एक-एक कण वाचवीण्याची नीतांत गरज आहे.कारण देशातील वाढती लोकसंख्या,जगातील युद्धजन्य परिस्थिती,बदलते हवामान पहाता अन्न-धान्याचे जतन करने अत्यंत गरजेचे आहे.कारण भारतात बालकांच्या कुपोषणाची स्थिती अत्यंत वाईट आहे.त्याचप्रमाणे मी सरकारला आग्रह करतो की अन्न-धान्याचा काळाबाजार ताबडतोब रोखला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवरल्या पाहिजे.तेव्हाच विश्व खाद्य दिवसाला खरे महत्व येईल.संपूर्ण जग एकीकडे खाद्यांनासाठी आठा-पीटा करून वन-वन हिंडत आहे तर दुसरीकडे संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसल्याचे दिसून येते. म्हणजेच आज जगात खाद्यान्ना पेक्षा दारूगोळ्याला जास्त महत्व दील्याजात आहे.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवू शकतो.याकरिता जीवन जगण्यासाठी खाद्यांनाकडे प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण,भुकमरी याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार नाहीच

जागतिक पातळीवर सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या नोबेल पुरस्काराची घोषणा दरवर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात केली जाते. मानव कल्याणासाठी झटणाऱ्या विविध क्षेत्रातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक आणि जागतिक पातळीवर शांततेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी या पुरस्काराकडे सगळ्या जगाचे लक्ष लागले होते कारण यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मलाच मिळणार असा ( फाजील ) आत्मविश्वास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना होता. तसे त्यांनी अनेकदा बोलूनही दाखवले होते त्यामुळे त्यांना खरंच हा पुरस्कार मिळेल का? याची उत्सुकता जगभर होती. शांततेच्या नोबेल पुरस्काराची घोषणा शुक्रवारी दहा ऑक्टोबरला झाली आणि त्यावरील सस्पेन्स संपला. शांततेचा नोबेल पुरस्कार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मिळालाच नाही. यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला तो व्हेनेझुएलाच्या मारिया कोरिना मचाडो यांना आणि मचाडो यांना पुरस्कार का मिळाला यापेक्षा ट्रम्प यांना पुरस्कार का मिळाला नाही याचीच जगभर याची चर्चा झाली. डोनाल्ड ट्रम्प यांनी हा पुरस्कार मलाच मिळणार यासाठी मी सात युद्धे थांबवली व जगात शांती निर्माण केली अशी सातत्याने वल्गना करून एकप्रकारे नोबेल पुरस्कार समितीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या दबावाला नोबेल पुरस्कार समिती बळी पडली नाही. त्यांनी योग्य निर्णय घेत डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार नाकारीत योग्य व्यक्तीला पुरस्कार दिला याबद्दल नोबेल पुरस्कार समितीचे कौतुकच करायला हवे. डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार हवा होता त्यासाठी त्यांनी मोठा थयथयाट केला. सातत्याने मी सात युद्धे थांबवली अशी वल्गना केली मात्र अमेरिकेनेच अनेक देशांना फुस लावून युद्धाच्या गर्तेत ढकलले हे लपून राहिले नाही. आधी भांडण लावून देणे आणि नंतर ते सोडवण्याचे नाटक करणे त्यातून आपला स्वार्थ साधणे हेच अमेरिकेचे धोरण आहे. डोनाल्ड ट्रम्प असो की अमेरिकेचे याआधीचे राष्ट्राध्यक्ष त्यांनी इतर देशांकडे फक्त आपल्या शस्त्रास्त्रांचे गिऱ्हाईक म्हणून पाहिले. आपली शस्त्रास्त्रे विकली जावीत यासाठी अमेरिकेने अनेक देशात युद्ध पेटवली हा इतिहास आहे. आता हेच पाहा ना... भारत पाकिस्तानचे युद्ध मीच थांबवले अशी शेखी मिरवणारे व त्याद्वारे नोबेल पुरस्कारावर हक्क सांगणारे डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला घातक शस्त्रात विकणार असल्याची बातमी नुकतीच वर्तमानपत्रात वाचली आता. जर डोनाल्ड ट्रम्प हे खरंच शांततेचे भोक्ते असते तर त्यांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रे का विकली असती ? पाकिस्तान या शस्त्रांचा वापर भारताविरोधात करणार जर पाकिस्तानने हे शस्त्र भारताविरुद्ध वापरले तर भारतही त्याला उत्तर देणार मग पुन्हा संघर्ष उफाळणार. जर ही शस्त्रे दहशतवाद्यांच्या हातात पडली तर भारतासोबतच संपूर्ण जगाला धोका पसरू शकतो. मग पाकिस्तानसारख्या दहशतवादी देशांना शस्त्रे विकून जगभर अशांतता पसरवणाऱ्या ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार कसा मिळणार ? म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीने घेतलेला हा निर्णय अतिशय योग्य आहे. ज्या मारिया माचाडो यांना हा पुरस्कार देण्यात आला त्या त्याच्या हकदार होत्याच. मारिया मचाडो या हॉवर्ड विद्यापीठातील पदवीधर आहेत आणि त्यांच्या व्हेनेझुएला देशातील हुकुमशाही विरुद्ध त्यांनी आवाज उठवला आहे. भ्रष्ट हुकुमशाही विरुद्ध स्वतःचा जीव धोक्यात घालून लढणाऱ्या मारिया मचाडो या लोकशाहीचा आवाज आहेत. मागील वर्षी या देशात निवडणुका झाल्या. या निवडणुकीत मचाडो या उभ्या राहिल्या मात्र त्यांना निवडणुकीत उभे राहण्यापासून रोखण्यात आले. त्यांना अपात्र घोषित करून त्यांचे राजकारण संपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण त्या सरकारच्या या दमनशाहिला दबल्या नाहीत. त्यांनी या विरोधात आवाज उठवला. संपूर्ण देशाला हुकुमशाही विरुद्ध एकत्र केले. देशात लोकशाही टिकावी म्हणून जीव धोक्यात घालून लढल्या त्यामुळेच त्यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड सर्वार्थाने योग्य आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि मारिया मचाडो यांची तुलना होऊ शकत नाही. लोकशाहीच्या नावाखाली हुकुमशाही राबवणारे ट्रम्प या पुरस्कारासाठी पात्र ठरूच शकत नाही म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीच्या या निर्णयाचे जगभर कौतुक होत आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### जिल्हा स्त्री रूग्णालचे उल्लेखनिय कार्य

## प्रसुती विषयक उत्कष्ट सेवा - डॉ एस झेड गवारे

**जालना | प्रतिनिधी -** जिल्हा स्त्री रूग्णालयात हे प्रसुती विषयी सेवेसाठी आरोग्य सेवेचा कद्रेबिदु करत आहे दरमहा ६०० - ६५० प्रसुती होतात तसेच ८ ते १५ सिझर शस्त्रीकिदया होतात बाह्य रुग्ण सेवा दररोज ९० १६० आहेत ळऊि १२५० दरमहा असते वैद्यकीय अधीक्षक डॉ झडे गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसुती सेवे सह स्वच्छता शिस्त सर्व सेई विविधा अंत्यंत उत्कुष्टा पणे देण्या बाबत वैध्यकीय अधीक्षक डॉ एस झेड गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वजण प्रयत्न करतात

धुमुपान बाबत तपासणी स्वच्छता. समुपदेशन विषय कामे केले जाताना या रूग्णालयात जिल्हा तसेच इतर जिल्हयातील माता प्रयुतीन विययु सेवेसाठी येतात होतात अनि जोविमी गंभीर मातांचे या रूग्णालयातुन सदभिन करन्यातचे प्रमान खुप कमी झाले आहे या रूग्णालयातील सर्व डॉ नर्स. अतिशय मेहनतीने रूग्याची काळजी घेतात तसेच वैद्यकीय अधीक्षक यांच्या विशेण मार्गदर्शनाखाली या रुग्णालयातील विविध कार्यक्रम सतत नियै पूर्ण बाबत म्हणून घेतले जातात ही अत्यंत चांगली बाब आहे जनतामन्यात या रुग्णालय बाबत समाधान आहे

# मुलांच्या हातातील मोबाईल सुटता..सुटेना

## मुले तनावग्रस्त तर पालक चिंतेत, उपायच सुचत नसल्याने भलेभले हतबल..!

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात आता प्रत्येकाच्याच हातात स्मार्टफोन आले आहेत. सर्व कामे, शासकीय व्यवहार, ऑनलाइन झाल्याने मोबाइल हा सर्वांच्याच कामाचा एक अविभाज्य घटक बनला आहे. अनेकांची सकाळ तर स्मार्टफोन हातात घेऊनच होते, तर रात्री बारा-एक-दोन वाजेपर्यंत मोबाइल डोळ्यासमोरून जात नाही. असे असतानाच लहान मुलांमध्येही मोबाइल वापरण्याचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याचे विदारक चित्र बघायला मिळत आहे. दिवसेंदिवस लहान मुलांमध्ये मोबाइलचे इतके आकर्षण वाटू लागले की, अनेक लहान मुलांना त्याचे व्यसन लागले असून मोबाइलशिवाय त्यांना जेवण जात नाही अशीही काही मुलांची अवस्था झाली आहे. मात्र, अशा प्रकारच्या वाईट सवयींमुळे लहान मुलांमध्ये त्याचे दुष्परिणामही दिसायला लागले असून लठ्ठपणा बरोबरच डोळ्यांच्या आजारांचा धोका वाढला आहे.

लहान मुले मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहेत की त्यांना जेवताना मोबाइल दिला तरच ते जेवण करतात, नाही तर मला भूक नाही म्हणून जेवण सोडतात. अनेक शाळांचा दररोजचा अभ्यास हा मोबाईलवरच येतो त्यामुळे पाल्याचा अभ्यास होण्यासाठी पालकांना त्याच्याकडे मोबाईल द्यावाच लागतो. यातून मुलांकडे जास्तवेळ मोबाईल दिल्याने नकळत त्यांना मोबाईलची सवय लागते. मात्र याचा




परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो व मुले जेवण नाही म्हणून आपण त्यांना थोड्या वेळापुरता का होईना मोबाइल देतोच व याची त्यांना हळूहळू सवय लागते.

मोबाइल दिला तरच ते जेवण करतात. मुलांना मोबाइलची इतकी सवय लागली आहे की, मोबाइल बघतच ते जेवण करतात. हा प्रत्येक घरातील गंभीर विषय बनत चालला आहे. अनेक विद्यार्थी फक्त दुपारी शाळेतच जेवतात पण सकाळी व संध्याकाळी जेवतच नसल्याने त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यवर होत असल्याचे आरोग्य विभागाच्या सर्वेक्षणातून दिसत आहे. प्रत्येक आई वडिलांना वाटते आपली मुले हुशार व्हावीत यासाठी शाळेतील अभ्यास तसेच अधिक तासांचा भार त्यांच्यावर लादला जातो. यामुळे मुलांना बालपणीचे खेळ खेळायला वेळच मिळत नाही त्यामुळे मुले कणखर बनणार कशी ? आणि राहिलेला वेळही मोबाईलवरील अभ्यासात गेल्याने मुलांमध्ये चिडचिडपणा वाढत आहे.

=९केवढा हा विरोधाभास...

एका बाजूला मुलांना मोबाईल हातात देवू नका असे सागणाऱ्या तज्ञांचीच मुले मोबाईलच्या अती वापरात गुरफटलेली आहेत. त्यामुळे सर्वजन हतबल झाल्याचे चित्र आहे. दुसऱ्या बाजूल 'एन.ए.एम. एस.' सारख्या परिक्षा शासनच मोबाईलवर घेवू लागल्याने मुलांना मोबाईलपासून दुर रहा म्हणायचे तरी कसे असा प्रश्न आता सर्वांनाच पडू लागला आहे. एका बाजूला मोबाईल वापरू नका म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला मोबाईल वरच परीक्षा घ्यायच्या केवढा हा विरोधाभास आहे.

पान १ वरुन

### नाट्यगृह व आंबेडकर ...

बिकट झालेली आहे. स्वच्छतेचा पूर्ण अभाव असून, अर्ध्याहून अधिक खुर्च्यांवर बसणे अशक्य आहे. शौचालयांची दुरवस्था आणि वातानुकूलन यंत्रणा निकामी असल्याने कार्यक्रमादरम्यान साहित्यप्रेमी व प्रेक्षकांची गैरसोय होते.या प्रश्नावर शहरातील अनेक महिला समाजसेविका, साहित्यप्रेमी आणि सांस्कृतिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत निवेदन सादर केले आहे. नाट्यगृह आणि सभागृहाची त्वरित दुरुस्ती, स्वच्छता आणि तांत्रिक सुधारणा करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर रसना देहेडकर, विद्या कुलकर्णी, सुनंदा बदनापूरकर, विजया बागुल, भारती मोरे, सुवर्णा राऊत, माधुरी देहेडकर, सीमा विनय देशपांडे, स्मिता वझरकर, सुलभा शिपोरकर, सुलभा कुलकर्णी, नेहा दंडे, विशाखा नाईक, सुखदा देशपांडे, उज्वला मगरे, संध्या मगरे, आशा भाले, दीपाली बिन्निवाले, उज्वला बालुरकर, शोभा देशपांडे, जयश्री शहाणे, गीता मालपाणी, गीता सोपान पितळे, मंजुषा कुलकर्णी आदींच्या सह्या आहेत. या सर्व महिलांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर त्वरित कारवाई झाली नाही तर शांततेच्या मार्गाने आंदोलन छेडले जाईल. स्थानिक रंगकर्मींचे म्हणणे आहे की, जालना हे केवळ औद्योगिक नव्हे तर सांस्कृतिक परंपरेनेही समृद्ध शहर आहे. मराठी रंगभूमीचे असंख्य प्रयोग येथे रंगले; अनेक ख्यातनाम कलाकारांनी येथे हजेरी लावली. अशा ऐतिहासिक वारशाचे केंद्र असलेले हे नाट्यगृह आणि सभागृह आज दुर्लक्षित अवस्थेत आहे, हे दुर्दैवी आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन नाट्यगृहाचे आधुनिकीकरण, सभागृहाची स्वच्छता व नूतनीकरण यासाठी निधी उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याची मागणी सांस्कृतिक वर्तुळातून होत आहे.

जालन्याची ओळख कला, संस्कृती आणि साहित्य यासाठी आहे. मात्र, सार्वजनिक सुविधांचा ऱ्हास हा शहराच्या सांस्कृतिक जीवनावर आघात आहे. प्रशासनाने जर तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर केवळ इमारतींचाच नव्हे तर शहराच्या सांस्कृतिक आत्म्याचाही ऱ्हास होईल.

# लहान भावाच्या स्टेम सेल्स दानातून वाचले मोठ्या भावाचे प्राण

## खर्चासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीची मदत

**मुंबई । प्रतिनिधी -** अकोला येथील १६ वर्षीय मुलाला रक्ताचा कर्करोग झाल्याने त्याच्यावर बोन मॅरो प्रत्यारोपण करणे आवश्यक होते. परंतु उपचाराचा खर्च कुटुंबाला उपचार परवडणारे नव्हते. या संकटाच्या काळात १२ वर्षीय लहान भावाने आपल्या मोठ्या भावाला 'स्टेम सेल्स दान करून त्याचे प्राण वाचवले. तर आर्थिक मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाने पुढाकार घेतल्याने उपचार शक्य झाले. जीवन (नाव बदलले आहे) हा १६ वर्षीय मुलगा आपल्या आई-वडिलांसह आणि १२ वर्षीय लहान भावासोबत अकोला येथे राहतो. वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. काही महिन्यांपासून जीवन सतत आजारी पडत होता. सुरुवातीला स्थानिक रुग्णालयात उपचार करूनही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्याला पुढील तपासणीसाठी मोठ्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तिथे रक्त तपासणीतून जीवनला रक्ताचा कर्करोग असल्याचे निदान झाले.

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचाराकरिता बोन मॅरो प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. तसेच उपचारासाठी सुमारे २५ ते ३० लाख रुपये खर्चाचा अंदाज वर्तविला. या परिस्थितीत डॉक्टरांनी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत घेण्याचा सल्ला दिला होता. जीवनच्या पालकांनी तातडीने मुंबई गाठली. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षात धाव घेत, कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्याशी संपर्क साधला. श्री.नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार तातडीने कार्यवाही केली. त्यातूनच मुंबई येथील जसलोक रुग्णालयात जीवनवर उपचार सुरू करण्यात आले.

**विविध स्रोतांतून मदतीचा हात**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून, टाटा ट्रस्टच्या मोठ्या योगदानातून तसेच काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने एकूण २५ लाखांची मदत उभी करण्यात आली. ४ सप्टेंबर २०२५ रोजी जीवनच्या १२ वर्षीय लहान भावाने अस्थिमज्जा (स्टेम सेल्स) दान केले आणि त्यानंतर जसलोक रुग्णालयात जीवनवर यशस्वी बोन मॅरो प्रत्यारोपन करण्यात आले.

**जीवनप्रमाणे अनेक रुग्णांना मदतीचा हात**

जीवनप्रमाणेच अनेक गरीब व गरजू रुग्णांवर संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार उपचार करण्यात येत आहेत. दुर्धर आजार झाल्यास कोणीही हताश न होता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संपर्क साधावा. त्यासाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांस सतीश घाटगेंनी दिला आधार

# शॉर्ट सर्किटमुळे जळलेल्या उसाची केली पाहणी

## भरपाईसाठी महावितरण कंपनीकडे करणार पाठपुरावा

**घनसावंगी । प्रतिनिधी** - तालुक्यातील तनवाडी-राहेरा येथे शॉर्ट सर्किटमुळे आग लागून शेतकऱ्यांच्या ऊस पिकाचे मोठे नुकसान झाले. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन भेट घेत धीर दिला आणि जळीत उसाची पाहणी केली. तसेच, कारखाना सुरू होताच जळित उसाची त्वरित तोड करण्याच्या सूचना त्यांनी समृद्धी कारखान्याच्या यंत्रणेला दिल्या.

शेतातून गेलेल्या विद्युत तारांमुळे नेहमी शॉर्ट सर्किटच्या घटना घडतात. तनवाडी-राहेरा येथेही शॉर्ट



सर्किटमुळे शेतकऱ्यांचा ऊस जळाल्याची दुर्दैवी दुर्घटना झाली, यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी बुधवारी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेऊन पाहणी केली. तसेच, कारखाना सुरू होताच जळित उसाची तोड करण्याच्या सूचना समृद्धी कारखान्याच्या यंत्रणेला दिल्या. याव्यतिरिक्त, महावितरणकडून जळित उसाची भरपाई शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी ते प्रयत्न करणार असल्याचा विश्वास त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

# 'त्या' प्रकरणातील कारवाई थांबवा

## कुल जमाअती विफाक जालन्याच्या वतीने राष्ट्रपतींना निवेदन

**जालना । प्रतिनिधी** - कुल जमाअती विफाक महाराष्ट्र जालन्याच्या वतीने बुधवार (दि १५) रोजी जालना जिल्हाधिकाऱ्यांच्या मागणी सादर केली. या प्रसंगी, जालना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भारताच्या राष्ट्रपतींना आय लव्ह मुहम्मद स्टिकर्स प्रकरणी संपूर्ण देशात, विशेषतः उत्तर प्रदेशात निष्पाप मुस्लिम तरुणांच्या बेकायदेशीर अटकेची मालिका थांबवावी आणि भारतीय मुस्लिमांचे धार्मिक नेतृत्व मौलाना तौकीर रजा खान बरेलवी यांची तात्काळ सुटका करावी आणि अहमदनगरमध्ये पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा अपमान करणाऱ्या आणि राज्यात विषारी विधानांद्वारे राज्याचे वातावरण बिघडवणाऱ्या राजकारण्यांवर आंतरधार्मिक फूट पाडल्याबद्दल गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात



आली.

यावेळी कुल जमाअती विफाक महाराष्ट्र जालना यांच्या शिष्टमंडळात लियाकत अली खान यासिर वाहदत-ए-इस्लामी हिंद जालना, मौलाना मुहम्मद नसरुल्लाह हुसैनी सोहेल नदवी जमियत-ए-उलेमा हिंद जालना, मौलाना मुहम्मद अब्दुल सलाम जमियत-ए-उलेमा हिंद जालना, इक्बाल पाशा वरीष्ठ नेते , अडोकेट सोहेल सिद्दिकी , बदर चाऊस प्रदेश उपाध्यक्ष काँग्रेस अल्पसंख्याक सेल, फिरोज अली मुस्लिम विकास परिषद, अतीक अहमद खान अध्यक्ष जालना जिल्हा शहर काँग्रेस, अब्दुल रऊफ परसुवाले माजी सभापती जिल्हा परिषद जालना, आमिर पाशा नगर पालिका जालना राष्ट्रवादी काँग्रेस सदस्य, कलीम खान, शेख जावेद, फय्याज बागबान, राहुल कसबे, मुहम्मद सुलेमान आदी उपस्थित होते.

आमदार अर्जुनराव खोतकर यांचे शेतकऱ्यांना आवाहन

# शेतकऱ्यांनी तत्काळ आवश्यक कागदपत्रे अपलोड करून योजनांचा लाभ घ्यावा

**जालना । प्रतिनिधी -** तालुका कृषि अधिकारी कार्यालयाच्या माहितीनुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी कृषी विभागाच्या विविध योजनांअंतर्गत एकूण ३२,८२८ शेतकऱ्यांची ऑनलाइन निवड झालेली आहे. शासनाच्या म हत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची अपलोड प्रक्रिया सुरू असून, निवड झालेल्या सर्व शेतकऱ्यांनी तत्काळ संबंधित कागदपत्रे सादर करावीत, असे मा. आमदार श्री. अर्जुनराव खोतकर यांनी आवाहन केले आहे. खोतकर यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ कोणत्याही अडथळ्याशिवाय मिळावा, हे आमचे प्राधान्य आहे. प्रत्येक शेतकऱ्याने ऑनलाइन प्रक्रियेत आपली कागदपत्रे वेळेत अपलोड करून योजनांचा फायदा घ्यावा. शासनाच्या सर्व योजनांचा पारदर्शक व वेळेवर लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने पूर्ण तत्परता



दाखवावी, असे त्यांनी स्पष्ट केले. जालना तालुक्यातील शेतकऱ्यांची खालील योजनांमध्ये निवड झालेली आहे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना ६४६८, राष्ट्रीय कृषी विकास योजना (शेततळे अस्तरीकरण) २३१, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (कृषी सिंचन)१३२, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना (वैक्तिक शेततळे) १५५, राज्य पुरस्कृत कृषी यंत्रीकरण योजना २२९३५, कृषी यंत्रीकरण उपअभियान २१४९, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (कृषी यंत्रीकरण) ४५, राष्ट्रीय कृषी विकास योजना (कृषी यंत्रीकरण) ८, भाऊसाहेब फुंडकर फलोबाग लागवड योजना ७०५. असे एकूण ३२,८२८. मा. खोतकर यांनी पुढे सांगितले की, शासन व प्रशासनाने राबविलेल्या या योजनांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीस लागेल, उत्पादनक्षमता सुधारेल आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम बनेल.

शेतकऱ्यांनी आपल्या नावाची निवड झालेली असल्यास सात दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे अपलोड करून योजनांचा लाभ निश्चित करून घ्याव, तसेच याबाबत तालुका कृषी अधिकारी कार्यालय जालना यांना संपर्क करावा, असे आवाहन मा. खोतकर यांनी केले आहे.



# जालन्यात पोलिसांचे रक्तदान शिबिर; जनसेवेचा उपक्रम की ढोंगी प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न?

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील कदीम जालना पोलीस ठाण्यात आयोजित रक्तदान शिबिराला पोलीस अधिकारी आणि कर्मचार्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात शहरातील सर्व पाच पोलीस ठाण्यांमधील अधिकारी, कर्मचारी आणि जवानांनी स्वयंप्रेरणेने रक्तदान केले.

या उपक्रमाचे आयोजन पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून, तसेच नागरिकांमध्ये जनसेवा आणि आरोग्य जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

**प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न?**

पोलीस दलाकडून सामाजिक कार्याचे कौतुक व्हायला हवे, परंतु याच वेळी नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाविषयी असलेली अविश्वासाची भावना नाकारता येत नाही. विशेषतः जालना जिल्ह्यात वाढत चाललेली गुटखा विक्री आणि त्यामागील पोलिसांची शिथिल भूमिका यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

शासनाने महाराष्ट्रात गुटखा विक्रीवर स्पष्ट बंदी घातली असतानाही, सतीश उर्फ 'लाला' या गुटखा माफियाचा प्रभाव जालन्यात टिकून आहे, असा नागरिकांचा आरोप आहे. नागरिकांच्या मते, स्थानिक पोलिस प्रशासनाने या माफियाविरुद्ध ठोस पावले उचलली असती, तर गुटख्याचा बाजार बंद पडला असता.

**एका हाताने रक्तदान, दुसऱ्या हाताने गुटखा माफियांना पाठबळ**

नागरिकांचे म्हणणे आहे की पोलिसांनी जनसेवेचा भाग म्हणून रक्तदान करणे हे स्वागतार्ह आहे; मात्र, त्याच पोलिसांकडून गुटखा माफियांना मिळणारे मौन समर्थन हे अत्यंत विरोधाभासी चित्र आहे.

गुटख्यामुळे युवकांचे रक्त हळूहळू विषारी होत असताना, हेच पोलिस त्याच समाजाचे रक्तदान करून सामाजिक जबाबदारीचे ढोंग करत आहेत - असा तीव्र रोष अनेक सामाजिक संघटनांनी व्यक्त केला आहे.

**खऱ्या अर्थाने रक्तदान तेव्हाच जेव्हा लाला माफिया हद्दपार**

स्थानिक कार्यकर्त्यांचे मत आहे की पोलिसांनी खऱ्या अर्थाने समाजासाठी रक्तदान करायचे असेल, तर प्रथम जालना जिल्ह्यातील गुटखा माफियांना संपवावे, त्यांच्या अवैध व्यवसायावर बंदी आणावी, आणि तरुणाईला व्यसनातून मुक्त करावे.

तेव्हाच हे रक्तदान शिबिर प्रत्यक्षात जीवनदान ठरेल. अन्यथा हे शिबिर प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न आणि दिखावा म्हणूनच गणले जाईल.

जालना पोलिसांकडून सामाजिक जबाबदारी म्हणून राबविण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच प्रशंसनीय आहे. परंतु, या उपक्रमांच्या आडून दडलेले प्रशासनातील दुटप्पी धोरण झाकले जाणार नाही.

एका बाजूला जनसेवेचे प्रदर्शन, तर दुसऱ्या बाजूला समाजविघातक गुटखा माफियांना अप्रत्यक्ष संरक्षण - या दोन्ही गोष्टी एकत्र राहू शकत नाहीत. पोलिस प्रशासनाने जर खऱ्या अर्थाने समाजाचे रक्त जपायचे असेल, तर युवकांचे रक्त शोषणाऱ्या व्यसनमाफियांना हद्दपार करणे हेच सर्वात मोठे 'रक्तदान' ठरेल.

## कदीम जालना पोलीस ठाण्यात आयोजित रक्तदान शिबिरात अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान

**जालना । प्रतिनिधी -** कदीम जालना पोलीस ठाण्यात आयोजित रक्तदान शिबिराला पोलिसांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी नऊ वा. पासून सायं. पाच वा. पर्यंत रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात जालन्यातील सर्व पाच पोलीस ठाण्यांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत रक्तदान केले.

पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सामाजिक जबाबदारी आणि जनसेवेचा भाग म्हणून हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ,सहा पो.निरि कदिम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे



आरती जाधव यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला.

या रक्तदान शिबिराचे आयोजन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलं होतं. पोलीस विभागाने आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराला पोलीस आणि सर्वसामान्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# जिल्हा पाणी स्वच्छता मिशन समितीची बैठक संपन्न




**जालना । प्रतिनिधी -** नागरिकांसाठी पाणी पूरवठा हा महत्वाचा विषय असून, जिल्ह्याकरीता जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर असलेली पाणी पूरवठ्याची कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या अध्यक्षेत आज जिल्हा पाणी स्वच्छता मिशन समितीद्वारे आयोजित जल जीवन मिशनच्या आढावा बैठकीती मैत्रेवार बोलत होत्या. यावेळी जिप ग्रामीण पाणी पूरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सर्जेराव शिंदे, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणाचे सहायक भूविज्ञानिक श्री. गिरीधरा, ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील तालूका उप अभियंता आदींची उपस्थिती होती.

जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील अंबड, बदनापूर, भोकरदन, घनसावंगी, जाफ्राबाद आणि जालना या तालूक्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पूरवठा योजनेची कामे मंजूर झालेली आहे. तर उर्वरीत परतूर व मंठा तालूक्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यंत्रणेद्वारे २ ग्रीड पाणी पूरवठा योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्याकरीता जलजीवन मिशन अंतर्गत ७४५ योजना मंजूर असून, याकरीता ५२४.३१ कोटी रुपयांच्या आराखड्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. या योजना पैकी २५८ योजनाचे १०० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. तर ३१९ योजना या पूर्णत्वाच्या टप्प्यात असून, उर्वरीत १६४ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. जल जीवन मिशन योजनांच्या कामांसाठी राज्य व केंद्र शासनाकडून २१५ कोटी निधी प्राप्त झाला असून, हा सर्व निधी खर्च झाला आहे. तसेच झालेल्या कामाचे देयके अदा करण्यासाठी शासनाकडे १०४ कोटी रुपये निधीची मागणी करण्यात आल्याची माहिती जिप ग्रामीण पाणी पूरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सर्जेराव शिंदे यांनी दिली.

## माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. श्रीमती कुलकर्णी यांनी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तसेच वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपले स्नेही, मित्र तसेच कुटुंबातील सदस्यांना वर्षातून किमान एक तरी पुस्तक भेट देवून प्रोत्साहीत करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या प्रसंगी उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# शेतकऱ्यांना २४ तास वीज द्या अन्यथा महावितरण कार्यालयात सापं सोडू

## वंचित बहूजन आघाडीचा मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे ईशारा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील ३७ शेतकऱ्यांना पाण्याची रात्र पाळी देताना सर्प दंश झालेला आहे त्यामुळे शेतकऱ्यांना २४ तास वीज द्या,त्यांची विजेची समस्या सोडवा अन्यथा महावितरण कार्यालयात साप सोडू असा ईशारा वंचीत बहुजन आघाडीच्या वतीने मुख्यमंत्री फडणवीस यांना देण्यात आला आहे. वंचित बहूजन आघाडीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २४ तास विज देण्याची मागणी केली आहे.आज वंचित बहूजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन दिले त्यात ही आग्रही मागणी करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील विजेच्या प्रश्नाकडे कुणीही गंभीरपणे पाहत नसून शेतकऱ्यांची विजेची समस्या सोडवा अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

यावेळी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की वाघुळ (ज) गावातील शेतकऱ्यांच्या हितार्थ संवेदनशिल विषयाबाबत निवेदन सादर करतो की, सध्या वाघुळ (ज) सह जालना शहरात आपल्या विद्युत वितरण कंपनी मार्फत अनियमित विद्युत पुरवठा सुरु आहे. दिवसातुन ८ तास लोड शेडींग आणि नंतरच्या ८ तासामध्ये अवेळी होणारी विज कपात या मुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात त्रस्त झालेला आहे. शेतीसाठी पाणी देणे अथवा इतर मशागतीचे कामे करतांना विज पुरवठा खंडीत होणे यामुळे शेतकऱ्यांना शेतीचे पाणी देणे, सिंचन करणे आणि फावारणी करणे अशी आवश्यक कामे नियमितरित्या करणे शक्य होत नाही. त्यामुळे शेतीचे नुकसान होत आहे. आधीच जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीने अवकाळी संकट ओढावलेले आहे. त्यामुळे विज वितरण कंपनीकडुन शेतकऱ्यांची जास्तच पिळवणुक केली जात आहे, ही अत्यंत खेदाची आणि निंदनीय बाब आहे.




ग्रामिण भागामध्ये रात्री बेरात्री देखील विजपुरवठा अचानक खंडीत केल्या जातो. ग्रामिण भागामध्ये अचानक विजपुरवठा खंडीत मुळे शेतकरी वर्ग खुप हैरान झालेला आहे. त्यामुळे विज येईल त्या वेळेला शेतकऱ्यांना रात्री बेरात्री शेतामध्ये थांबुन काम करावे लागते. रात्री अंधारामध्ये सर्प विंचु आणि काटे यांना झुंज देऊन शेतकरी काम करत आहे. अशी झुंज शेतकऱ्यांच्या जिवावर बेतत आहे. यामध्ये ३-४ महिन्याच्या दरम्यान जिल्ह्यामध्ये ६७ लोकांना सर्पदंश झालेला असुन त्यामध्ये १४ लोकांचा मृत्यु झालेला आहे. हे सर्वच शेतकरी कुटूंबियातील व्यक्ती होते. अनियमित विजपुरवठ्यामुळे ग्रामिण भागामध्ये रात्री बेरात्री शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना आणि घरातील महिलांना अपुऱ्या उजेडामुळे सर्पदंश झाल्याचे सिध्द होत आहे. त्याच बरोबर अशा प्रकारे सर्पदंश होऊन जिल्ह्यातील तब्बल ११२ जनावरे दगावली आहे. अशा सर्व जिवीत हाणीस केवळ आणि केवळ विद्युत वितरण कंपनी आणि तिचा अनागोंदी कारभारच जबाबादार आहे. गेल्या काही महिन्यांपासुन ग्रामिण भागा बरोबरच शहरी भागामध्ये देखील अशाच प्रकारच्या नाहक त्रासास नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे विज वितरण कंपनी ही केवळ शेतकरी, कष्टकरी आणि गरीब नागरिकांकडुन केवळ आव्वाच्या सव्वा विजबिलं आकारणी आणि दमदाटी करुन त्याची वसुली करण्यासाठीच कटीबध्द आहे की काय? अशी खात्री पटत आहे.

करीता आपणांस या निवेदनाच्या आधारे विनंती करण्यात येते की, येत्या ८ दिवसांत वाघुळ (ज) सर्कलसह जालना जिल्ह्यातील अघोषित भारनियमण आणि वारंवार खंडीत होणारा विजपुरवठा त्वरीत बंद करण्यात यावा. काही तांत्रिक अडचणी असल्यास त्याचा निपटारा त्वरीत करण्यात यावा. अन्यथां वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शेतकऱ्यांच्या हितार्थ विद्युत वितरण कंपनीच्या जालना येथील कार्यालयात सर्प सोडुन अंदोलन करण्यात येईल आणि न्याय मागण्यात येईल. या अंदोलनाचे होणारे परिणामास प्रशासन जबाबदार राहील असल्याचे दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी वंचित बहुजन आघाडी युवा जिल्हाध्यक्ष विजय लहाने, तालुका अध्यक्ष भानुदास साळवे, जिल्हा उपाध्यक्ष शेख लाला भाई, दत्तु कुरधने, सिध्दार्थ कनकुटे, बालाजी वाहेकर, अंकुश गाडेकर, अरुण गायकवाड, राजेंद्र खरात, उत्तम खरात, विजय कांबळे, मनोज लोखंडे, नितेश शिंदे, वैभव वानखेडे, भिवाजी खरात यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कै. स्व. प्रशांत नवगिरे यांच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप व अन्नदान

**जालना । प्रतिनिधी -** विटी दांडू गील्ली दंडा खेळाचे जनक कै. स्व. प्रशांत नवगिरे सर यांच्या जयंतीनिमित्त व तसेच जागतिक विटी दांडू दिनानिमित्त अपंग निवासी विद्यालय नागेवाडी जालना येथे जयंतीचे अवचित्य साधून शालेय साहित्य व अन्नदान करण्यात आले यावेळी विटी दांडू परिवारातील सर्व पदाधिकारी व विटी दांडू परिवार उपस्थित होता यावेळी विटी दांडू संघटनेचे राज्याध्यक्ष गजानन जी वाळके सर तसेच विटी दांडू संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष डॉ. बाप्पा म्हस्के सर यांनी नवगिरे सर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले व विटी दांडू खेळाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच शाळेचे मुख्याध्यापक यांनी देखील अभिवादन केले व कोषाध्यक्ष विजय गाडेकर यांनी आभार प्रदर्शन केले यावेळी उपस्थित सौ. विद्या नवगिरे गौरव नवगिरे अपंग निवासी शाळेचे मुख्याध्यापक रमेश काकडे कर सौ. शालिनी तायडे राजेश लहाने राऊत सर आपके सर तसेच विटी दांडू खेळातील आंतरराष्ट्रीय खेळाडू कदिर सय्यद प्रदीप राठोड कृष्णा पवार विकास आढाव अलीम शेख सुधाकर राठोड आदींची उपस्थिती होती.



# वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रीया आहे. ज्ञानसंपन्न आणि माहिती समृध्द समाज घडविण्यासाठी वाचन संस्कृतीचा प्रचार, प्रसार व विकास होणे आवश्यक आहे. माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोंबर हा जन्मदिवस अर्थात वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, जालना येथे करण्यात आले आहे.

ग्रंथप्रदर्शन उदघाटनप्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी, जेष्ठ वाचक व निवृत्त मुख्याध्यापक मधुकर जोशी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकुर, शंकर पवार, गणेश हिवरे, चंद्रकांत गोमटे व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. ग्रंथप्रदर्शन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर, पत्रकार भवनशेजारी, जालना येथे सर्वासाठी खुले असुन जनतेने या प्रदर्शनाचा लाभ घेऊन शासकीय ग्रंथालयाचे सभासद व्हावे, असे आवाहन जालनाचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकुर यांनी केले आहे

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.